# -: प्रेस नोट :-

**कक्ष-११, गु.प्र.शा., गु.अ.वि., कांदिवली-प, मुंबई** **दिनांक:- २०/१२/२०२१**

## ''अवैध अग्निशस्त्रे व दारुगोळा विक्रीसाठी आलेल्या इसमास ४ पिस्टल व ०२ काडतूसांसह जेरबंद केलेबाबत''

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष-११, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.विभाग, कांदिवली पश्चिम, मुंबई. |
| पोलीस ठाणे | बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई |
| गु.नों.क्र. व कलम | डि.सी.बी., सी.आय.डी., वि.स्था.गु.र.क्र. ३९/२०२१ कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७ (१) (अ) सह १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा (एमएचबी पोलीस ठाणे, वि.स्था.गु.र.क्र. ७३/२०२१) |
| दाखल दिनांक | दि. १९/११/२०२१ रोजी १८.१० वा. |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण | दि. १९/११/२०२१ रोजी १४.३० वा. चे दरम्यान<br>ठिकाण- दहिसर नदी किनारा ब्रिजजवळ, कुंदन नगर, म्हाडा वसाहतीजवळ, दहिसर (पश्चिम), मुंबई |
| फिर्यादीचे नाव | पुरुष इसम, वय ४३ वर्षे. |
| अटक आरोपीची संख्या | ०१ |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | १) ०४ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे,<br>**एकुण किंमत अंदाजे रुपये १,०१,०००/-** |

**थोडक्यात प्रेस नोट :-**

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. सह पोलीस आयुक्त (गुन्हे) मुंबई यांनी अवैध अग्नीशस्त्र व दारुगोळा बाळगणाऱ्या इसमांविरुध्द् कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने कक्ष-११, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक हे अवैध अग्नीशस्त्रे व दारुगोळा बाळगणाऱ्या इसमांविषयी माहिती प्राप्त करुन त्याच्यावर कारवाई करण्याच्या प्रयत्नात होते.

दिनांक १९/१२/२०२१ रोजी कक्ष-११, गु.प्र.शा., गु.अ.विभाग, कांदिवली पश्चिम, मुंबई कक्षाचे **सपोनि अभिजीत जाधव** यांना गोपनीय माहीती मिळाली की, एक इसम हा त्याचेकडील अग्निशस्त्र व दारुगोळा विक्री करण्यासाठी रिक्षामधून दहिसर नदी किनारा ब्रिजजवळ, कुंदन नगर, म्हाडा वसाहतीजवळ, दहिसर (पश्चिम), मुंबई याठिकाणी येणार आहे. त्याबाबत वरिष्ठांना माहीती देवून तात्काळ **प्रपोनि विनायक चव्हाण** यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ११ चे पथकाने सदर ठिकाणी पाळत ठेवली. मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार सदर ठिकाणी संशयीत ऑटोरिक्षा आली असता पथकाने रिक्षाला थांबविले. रिक्षामध्ये बसलेला एक इसम हा संशयास्पद वर्तन व हालचाली करु लागल्याने त्यास तात्काळ ताब्यात घेवून पंचाच्या मदतीने त्याची झडती घेतली. सदर इसमाकडे एकूण ०४ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे मिळाली. चौकशीत त्याने सदर अग्निशस्त्रे व दारुगोळा कब्जात बाळगणेबाबत त्याचेकडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. सदर इसमाने बेकायदेशीररित्या अग्निशस्त्रे व दारुगोळा विनापरवाना कब्जात बाळगल्याने त्याचे विरुध्द् सरकारतर्फे फिर्याद नोंदवून उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याचेकडे मिळुन आलेले अग्निशस्त्र, दारुगोळा जप्त करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीने जप्त केलेल्या अग्निशस्त्रे व दारुगोळा कोठून व कोणाकडून आणला आणि कोणास विक्री करणार होता याबाबत तपास करीत आहोत.

**अटक इसम :-**

१) एक पुरुष इसम, वय २० वर्षे, रा.ठि. बोरीयापुरा, दुर्गामाता मंदिराजवळ, मुंढा, नेहरुनगर, कामठी, नागपूर, राज्य महाराष्ट्र.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलिंद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस. विरेश प्रभू, मा. पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. निलोत्पल, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) श्री. नितीन अलकनुरे यांच्या मागदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक, विनायक चव्हाण, पो.नि. मानसिंग पाटील, स.पो.नि. अभिजीत जाधव व अंमलदार सफौ दिपक कांबळे, पोहचा प्रशांत ढगे, पोना जयेश केणी, पोना प्रविण सावंत यांनी केली आहे.

***** D-1/95/2021*****